**किरकोळ अर्ज क्र.६९/२०२६**
अजय श्रीधर पातकळ
विरुध्द
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क – नेवासा.
MHAH190004692026

## निशाणी क्र.०१ वरील आदेश.

०१. प्रस्तुत अर्ज अर्जदार–अजय श्रीधर पातकळ, रा. चापडगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर यांनी त्यांच्या मालकीची हिरो मोटो कॉर्प लि. कंपनीची एच.एफ.डिलस्क मोटार सायकल नोंदणी क्र.एम. एच. १६ डी. के. ८५५० परत मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जामध्ये अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर वाहन हे दुय्यम निरीक्षक यांचे कार्यालय, नेवासा – ०२ यांचेकडील गुन्हा रजि. क्र.३२९/२०२५ मध्ये जप्त केले आहे. सदर वाहन अर्जदारास त्याचे दैनंदिन कामासाठी अत्यंत आवश्यक असुन सदर वाहन राज्य उत्पादन शुल्क कार्यालय येथे बंद स्थितीत पडून राहिल्यास सदर वाहनाचे स्पेअर पार्टस, इंजिन, टयुब, टायर खराब होउन निकामी होतील. त्यामुळे अर्जदाराचे कधीही भरुन न येणारे फार मोठे नुकसान होईल. सदर वाहन अर्जदारास सुपूर्तनाम्यावर परत मिळाल्यास अर्जदार न्यायालय घालून देईल त्या अटींचे पालन करण्यास तयार आहे. त्यावरुन अर्जदाराने अर्ज मंजूर करुन अर्जात नमूद जप्त वाहन सुपूर्तनाम्यावर मिळण्याची विनंती केली आहे.

०२. अर्जदाराने अर्जासोबत त्यांचे शपथपत्र, वाहनाच्या आर. सी. बुकची पडताळीत प्रत, अर्जदाराचे आधार कार्डची प्रत आणि गुन्हा रजि. क्र.३२९/२०२५ ची प्रत ही कागदपत्रे दाखल केले आहेत.

०३. प्रस्तुत अर्जावर दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय यांचे म्हणणे निशाणी क्र.०६ वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी सदर वाहन जप्त केल्याचे सांगितले आहे. तसेच सदर गुन्हयातील वाहन प्रकरणाचा निकाल लागे पर्यंत तपासी अधिकारी यांचे ताब्यात ठेवण्याचे आदेश होणेची विनंती केली आहे. तसेच सरकारी वकीलांनी त्यांच्या दिलेल्या म्हणण्यानुसार सदर जप्त वाहन हे अर्जदाराने गुन्हयाचे कामी वापरले आहे. सदर वाहनाच्या सहाय्याने अर्जदार त्याच प्रकारचा गुन्हा करण्याची

शक्यता आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. या प्रकरणी अर्जदार तर्फे विधिज्ञ श्री. जे. पी. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी युक्तीवादामध्ये अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केला. निश्चितपणे सदर गुन्हया संदर्भातील प्रकरण निकाली निघण्यास काही कालावधी लागणार आहे. तसेच सदर वाहन राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडे राहिल्यास अर्जदारास सदर वाहनाचा वापर करता येणार नाही व त्याठिकाणी सदर वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणी दाखल असलेली वाहनाच्या आर.सी. बुकचे अवलोकन केले असता सदर वाहन हे अर्जदाराच्या नावे असल्याचे दिसून येते. तसेच सदर वाहन परत मिळण्यासाठी इतर कोणीही अर्ज दाखल केलेला नाही. अर्जदार न्यायालय आदेशित करेल त्याप्रमाणे अटींचे पालन करण्यास तयार आहे.

०५. **सुंदरभाई विरुध्द गुजरात राज्य, (२००२) १० एससीसी २८३** मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले आहे की, जप्त मालमत्ता पोलीस स्टेशन मध्ये जास्त काळ ठेवू नये व जप्त मालमत्ता हे मालमत्ता मालकाच्या ताब्यात देण्यात यावे.

०६. सबब, वरील परिस्थिती आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाचा वरील न्यायानिर्णय लक्षात घेता माझ्या मते सदर जप्त वाहन काही अटी व शर्ती लावून अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देणे योग्य ठरेल. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यांत येतो.

२. दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, श्रीरामपूर – २, अहिल्यानगर यांनी गुं.र.क्र.३२९/२०२५ मध्ये जप्त असलेले हिरो मोटो कॉर्प लि. कंपनीची एच.एफ.डिलस्क मोटार सायकल नोंदणी क्र.एम. एच. १६ डी. के. ८५५० हे वाहन अर्जदार अजय श्रीधर पातकळ, रा. चापडगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर यांचेकडून रु.१,२०,०००/– (अक्षरी एक लाख वीस हजार मात्र) चा सुपूर्तनामा बॉन्ड घेतल्यानंतर अर्जदाराचे ताब्यात देण्यात यावे.

३. अर्जदाराने वर नमूद वाहनाच्या रंगामध्ये व स्वरुपामध्ये सदर गुन्हया संदर्भातील मूळ प्रकरणाचा निकाल लागे पावतो कोणत्याही प्रकारे बदल करु नये व मूळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यत न्यायालयाच्या पूर्व परवानगी शिवाय सदर वाहन विक्री किंवा हस्तांतरीत करु नये किंवा त्यावर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा हितसंबंध निर्माण करु नये.

४. अर्जदाराने सदर जप्त वाहन न्यायालय आदेश करील तेव्हा हजर करावे.

५. संबंधित राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, तपासी अंमलदार यांनी सदर वाहनाचे छायाचित्र काढून घ्यावेत व मुद्देमालाचे छायाचित्र डिजिटल प्रणालीचे कॅमे–याने काढल्यास त्या कॅमे–याचे मुळे मेमेरी कार्ड जपून सुरक्षित ठेवावे व नियमाप्रमाणे योग्य तो सविस्तर पंचनामा पंचासमक्ष करावा.

६. राज्य उत्पादन शुल्क, श्रीरामपूर – २, अहिल्यानगर यांनी अर्जामध्ये नमूद असलेल्या जप्त वाहनाच्या मूळ कागदपत्राची पडताळणी करुन सदर जप्त वाहन त्वरीत अर्जदाराचे ताब्यात द्यावे.

७. संबंधित गुं.र.नं.३२९/२०२५ मधील तपासिक अंमलदार यांनी आदेशाची पूर्तता केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल न्यायालयात लेखी स्वरुपात दोषारोपपत्रा सोबत जोडून दाखल करावा.

८. सहाय्यक अधिक्षक, यांनी संबंधित आदेशा बाबत राज्य उत्पादन शुल्क, श्रीरामपूर–२, अहिल्यानगर यांना कळवावे.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.18 12:23:13 +0530

दिनांकः– १७/०३/२०२६
ठिकाणः– शेवगाव

(वैशाली सं.मोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), शेवगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order/judgment are same word for word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Vaishali S. More, Jt. Civil Judge Jr. Div. & Judicial Magistrate F.C, Shevgaon. |
| Name of Steno | :- | S. B. Pisal Stenographer G-III |
| Date of Decision Order | :- | 17/03/2026 |
| Signed by Presiding Officer On | :- | 18/03/2026 |
| Order upload on | :- | 18/03/2026 |